# वेंगुर्ले येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात

रे. दि. मु. नं. 28/2018

श्री. चेतन अरुण सामंत ... वादी

वि.

श्री. मुंगेश लवू तुळसकर व. 77 ... प्रतिवादी

वादीतर्फे विनंती अर्ज असा की;




सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं. 1,2,4 व 5 यांनी जागेवरील रस्त्याबाबतची वस्तुस्थिती मे. न्यायालयासमोर येण्यासाठी कोर्ट कमीशनरची नियुक्ती होण्याकरीता अर्ज दिलेले होते. त्यांस वादीची कोणतीही हरकत नसल्याने प्रतिवादींच्या मागणीप्रमाणे मे. न्यायालयाने ॲड. श्री. किरण आर. पराडकर यांची कोर्टकमीशनर म्हणून नियुक्ती केली. त्यांस अनुसरुन कोर्टकमीशनर हे दिनांक 30/05/2019 रोजी कमीशनचे काम करण्यासाठी जागेवर आले असता त्यांच्या नोटीशीप्रमाणे वादी व वादीचे कुलअखत्यारी जागेवर उपस्थित होते.

सदरप्रमाणे कोर्टकमीशनर यांनी कमीशनचे काम सुरु केले असता प्रतिवादी नं. 15,16,19,29,32 व 76 यांनी या जागेवर कमीशनर यांना कमीशनचे काम करण्यास मज्जाव करुन अडथळा निर्माण केल्याने कमीशनचे काम पुर्ण होऊ शकले नाही. व त्याबाबतचा सविस्तर अहवाल कोर्ट कमीशनर यांनी आजरोजी मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

otherwise to say

प्रत्यक्षात कोर्टकमीशन होण्याचा अर्ज हा प्रतिवादी यांनीच दिलेला होता व त्यांस वादीची हरकत नव्हती व त्यानुसार प्रत्यक्षात कोर्ट कमिशनर हे कोर्टकमीशनचे काम करत असताना प्रतिवादी यांनी त्यांस मज्जाव केलेला आहे. त्यामुहे कोर्ट कमिशनर यांना कमिशनचे काम पूर्ण करता आलेले नाही. त्याबाबतचा विस्त्रुत अहवाल कोर्ट कमिशनर यांनी याकामी सादर केलेला आहे.

प्रतिवादीच्या एकंदरीत वर्तनावरुन वादीचा तुर्तातुर्त ताकीद अर्जाच्या चौकशीस येनकेन प्रकारे विलंब व्हावा व दरम्यानच्या काळात जागेवर दावा रस्त्याचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रतिवादीचा अंतस्थ हेतू स्पष्ट होत आहे. प्रत्येक्षात रस्त्याबाबतचा वादीच्या तुर्तातुर्त ताकीदीच्या मागणीस अनुसरुन वादीने आवश्यक तो पुरावा मे. न्यायालयासमोर सादर केलेला आहे. एवढेच नव्हे तर प्रतिवादी यांनी दावा रस्त्याचे अस्तित्व देखील मान्य केलेले आहे. प्रतिवादी यांनी आडमुठेपणाने अस्तत्वात असलेला दावा रस्ता

copy received
Adv. (Anil) Samant
27-6-19

जाणीव पूर्वक व वादीस नुकसान पोहोचविण्याच्या हेतुने अडविलेला आहे. अशा परिस्थितीत वादीस त्याचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज चालविणे आवश्यक व अनिवार्य व तातडीचे झालेले आहे. सबब प्रतिवादी हे कोर्टकमीशनच्या कामास जाणूनबुजून कुरापती काढून विलंब करत असल्याने कोर्ट कमिशनशिवाय वादीचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज तातडीने चालविण्यात यावा अशी विनंती आहे.

वेंगुर्ला

दिनांक : 15/06/2019

(signature)

(अॅड. एस. जी. प्रभू खानोलकर)

(signature)

श्री. अरुण मुकुंद सामंत

(वादीतर्फे कुळमुखत्यारी)

नम्रतापूर्वक म्हणणे असे की,

* वादीचा अर्ज व त्यातील मजकूर प्रतीवादी मजकूर यास मान्य व कबूल नाही -
* वादीचा अर्ज व त्यातील मजकूर हा खोटा, खोडसाळ व दिशाभूल करणारा आहे -
* प्रतिवादी मजकूर यांचा कधीही कोणत्याही कामकाजास विलंब करण्याचा अथवा तथाकथीत दावा वाटेचे अस्तीत्व नष्ट करण्याचा हेतु नव्हता व नाही -
* वादी आता केवळ पुरावा निर्माण करण्याच्या दृष्टीने दावा रस्त्याचे अस्तीत्व नष्ट करण्याचा प्रतिवादी यांचा अंतस्थ हेतू आहे असे म्हणत आहे. यावरुनच वादीचा खोटेपणा स्पष्ट होणारा आहे. नसलेल्या वाटेचे अस्तीत्व कसे नष्ट होऊ शकते हे न उलगडणारे कोडे आहे.
* प्रतीवादीने दावा रस्त्याचे अस्तीत्व कधीही मान्य केलेले नव्हते व नाही

करीता वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा ही विनंती.

(signature)

(Adv. Amol Samant)

---

Perused the application & say. After perusal of roznama it reveals that as per order below Exh-112 & 113 the court commissioner was appointed. Thereafter the court commissioner filed his report below Exh-138. In the report the commissioner specifically stated that some persons were disturbed the proceeding followed by the commissioner. Therefore as per report of the court commissioner it is necessary on the part of defendants were filed the application for appointment of court commissioner. But at the same time considering the grievance of plaintiff it is necessary to impose same condition. Hence defendants directed to take necessary steps to proceeds further on next date without fail. If the defendants failed to take steps necessary orders will be passed. & accordingly present application disposed off.

(signature)
20-6-19